# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या १९७ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ०२: ३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९७ वी तातडीची बैठक **सोमवार, दि.२८ एप्रिल, २०२५ रोजी दुपारी ०२:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. उमेश काकडे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ.अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

प्रभारी कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच डॉ. अतुल लकडे, प्रभारी कुलसचिव यांची ही प्रत्यक्ष पहिलीच बैठक असल्याने त्यांचे व विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर या पदावर नव्याने रुजू झालेले डॉ. उमेश काकडे यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदय यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**अभिनंदन:**

मा. प्र-कुलगुरु प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा यांना त्यांच्या संशोधन कार्यासाठी दोन पेटंट मिळाल्याबद्दल त्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांनी आपली अनुपस्थिती दूरध्वनीद्वारे कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | १. दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि.१५ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९६ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>२. दि.१५ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९६ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम. ए. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण आणि भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावासंदर्भात विद्यापीठाचे अध्यादेश (Ordinance) क्रमांक १३० (i) (A) नुसार एकूण रक्कमरु. ५,४२,४४०/- (अक्षरी रुपये पाच लक्ष बेचाळीस हजार चारशे चाळीस) फक्त विद्यापीठात भरणा करुन घेण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: मा. प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा यांनी जा. क्र. वायसीएमके/२०/२०२५-२६, दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र. १ ते ६ पत्राचा संदर्भ देवून विनंती केली आहे की, शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम. ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम सुरु केला होता. परंतु, विद्यार्थी संख्येच्या अभावामुळे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून सदर विषय बंद करण्यासाठीचा प्रस्ताव संस्थेने व महाविद्यालयाने दिनांक २२/०७/२०१४ रोजी संदर्भ क्र १ व २ नुसार विहित नमून्यात व आवश्यक असणारे शुल्क भरुन विद्यापीठाकडे सादर केला होता. त्यास अनुसरुन विद्यापीठाने संदर्भ क्र. ३ नुसार स्थानिक चौकशी समिती नियुक्त केली. स्थानिक चौकशी समितीने दिनांक २०/०३/२०१५ रोजी महाविद्यालयास भेट दिली. त्यानंतर समितीने दिलेल्या अहवालास अनुसरुन एम. ए. (इंग्रजी) बंद करण्याविषयी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार विद्यापीठाने महाविद्यालयास केला नाही. परंतु, संदर्भ क्र. ४ नुसार एम. ए. (इंग्रजी) बंद करण्यासाठी माहिती मागविली, महाविद्यालयाने आवश्यक असणारी माहिती विद्यापीठास पाठविली. संदर्भ क्र. ५ नुसार विद्यापीठाने डिसेंबर २०२४ पर्यंत एकूण रु. ५,३३,०००/- (अक्षरी रु. पाच लक्ष तेहत्तीस हजार) फक्त एवढे शुल्क भरण्याविषयी पत्र पाठविले.<br>वास्तविक पाहता, सन २०१४-१५ साली आम्ही एम. ए. (इंग्रजी) बंद करण्याविषयी विद्यापीठास प्रस्ताव पाठविला होता. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंत जे शुल्क होईल ते महाविद्यालय भरण्यास तयार आहे. असे विद्यापीठास संदर्भ क्र. ६ नुसार कळविले होते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासूनचे शुल्क माफ करण्यासाठी आपल्या स्तरावरुन कार्यवाही व्हावी, असे मा. कुलसचिव यांना उद्देशून विनंती केली आहे.<br>याबाबत कार्यालयीन निवेदन खालीलप्रमाणे :<br>सोबत जोडलेल्या घटनाक्रमाचे व दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता, खालील बाबी निदर्शनास येतात.<br>१) मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन क्र. अमवि२००६/(०५/०६)/मशि-३, दिनांक ०३/०६/२००६ उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी कायम विनाअनुदान तत्त्वावर एम. ए. भाग १ इंग्रजी या अभ्यासक्रमास मान्यता प्रदान केली आहे. | संलग्नता विभाग |

२) तर या कार्यालयाचे क्र. SOL/UTY/AFFi/४३६/११८५, दिनांक २७/०६/२००७ अन्वये महाविद्यालयाच्या जून २००६ पासूनच्या संलग्निकरणाच्या संदर्भात नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटींच्या अधीन राहून एम. ए. भाग १ (इंग्रजी) पाठ्यक्रमास जून २००६ पासून संलग्निकरणाकरिता एक (१) (२००६-०७) वर्षासाठी मान्यता दिल्याचे निदर्शनास येते.

तत्कालीन विद्यापीठ कायद्यातील तदानुषंगिक तरतूदी आणि विद्यापीठाच्या नियमानुसार शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये एम. ए. (इंग्रजी) भाग १ या अभ्यासक्रमास प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम. ए. (इंग्रजी) भाग १ या अभ्यासक्रमाच्या संलग्निकणाचे नुतनीकरण आणि भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव दिनांक ३१/०८/२००६ पर्यंत स्वतंत्ररित्या सादर करणे आवश्यक होते. कारण याबाबत प्रस्तुत कार्यासनाकडून दरवर्षी सर्व संलग्नित महाविद्यालयांना सदरची कार्यवाही होणेबाबत परिपत्रक पारित करण्यात येते. परंतु, संबंधित महाविद्यालयाने संलग्निकरणाचे नुतनीकरणाचा प्रस्ताव आणि नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव सादर केलेले नाहीत.

३) संबंधित महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २००६-०७ नंतर त्यांचे जा. क्र. विविमंक/२२१/२०१४-१५, दिनांक २२/०७/२०१४ अन्वये थेट शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून एम. ए. (इंग्रजी) अभ्यासक्रम बंद करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला होता.

सन २००६-०७ ते सन २०१४-१५ या दरम्यानच्या कालावधीत महाविद्यालयाने एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमाचे भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण आणि भाग २ चा नैसर्गिक विस्तार करुन घेणे आवश्यक होते. परंतु, तसे केलेले नाही, ही बाब ठळकपणे सकृतदर्शनी निदर्शनास येते.

४) महाविद्यालयाने एम. ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम बंद करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तवास अनुसरुन विद्यापीठ प्रशासनाने स्थानिक चौकशी समिती नियुक्त केली होती. सदर समितीने महाविद्यालयास प्रत्यक्ष दिनांक २०/०३/२०१५ रोजी भेट देवून दिनांक २७/०३/२०१५ रोजी अहवाल विद्यापीठाकडे सादर केला होता. सदर अहवालात समितीने एम. ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम बंद करणेबाबत शिफारस केली होती.

५) तद्नंतर प्रस्तुत कार्यालयाच्या दिनांक २३/०४/२०१५ रोजीच्या सादरीकरणावर प्राप्त आदेशानुसार क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/१०८७, दिनांक ११/०५/२०१५ अन्वये सदर महाविद्यालयाच्या सचिवांच्या नावे पत्र पाठवून खालील मुद्यांची मागणी केली होती.

i) एम. ए. मराठी, हिंदी व इंग्रजी भाग १ व २ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००६-०७ ते शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंतची वर्षनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या सादर करावी. तसेच सोबत सदर विद्यार्थ्यांचे विद्यापीठ पात्रतेची कागदपत्रे सादर करावीत.

ii) सदर प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी परीक्षेस बसले व त्यांचा शैक्षणिक वर्ष २००६-०७ ते शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंतचा परीक्षेचा वर्षनिहाय निकालाबाबतची माहिती सादर करावी व तसेच सोबत महाविद्यालयातील Ledger ची साक्षांकित प्रत सादर करावी.

iii) सन २००६ पासून प्रत्येक वर्षाचे महाविद्यालयास संलग्निकरण दिलेल्या विद्यापीठ मान्यतेच्या पत्राची प्रत सादर करावी.

iv) आपल्या संस्थेने नॅक करिता LOI सादर केलेला असल्यास त्याची एक प्रत सादर करावी.

६) उपरोक्त पत्रातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने महाविद्यालयाने क्रमांक वायसीएमके/६४/२०१५-१६, दिनांक ०२/०६/२०१५ च्या पत्रानुसार एम. ए. (इंग्रजी) भाग १ ला शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये १५ विद्यार्थ्यांना प्रवेश देवून परीक्षेस बसविले आहे. तर एम. ए. (इंग्रजी) भाग २ ला शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये ३३ विद्यार्थ्यांना प्रवेश देवून परीक्षेस बसविले आहे. शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये इंग्रजी भाग २ साठी १६ विद्यार्थ्यांना प्रवेश देवून परीक्षेस बसविले आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये इंग्रजी भाग १ साठी २१ विद्यार्थ्यांना प्रवेश देवून परीक्षेस बसविले आहे.

७) तद्नंतर प्रस्तुत कार्यालयाच्या दिनांक ०३/०३/२०२३ रोजीच्या सादरीकरणावर प्राप्त आदेशानुसार क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२-२३/१९४४, दिनांक २३/०३/२०२३ अन्वये खालील बाबींची पूर्तता करणेबाबत महाविद्यालयास कळविण्यात आले होते.

i) एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणापासून ते शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंत प्रवेशित व परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या यादीसह.

ii) संलग्निकरण मान्यता पत्रांच्या सत्यप्रती.

iii) शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव सादर न करण्यामागील कारणांसह अभिप्राय.

८) या कार्यालयाच्या सदर पत्राच्या अनुषंगाने महाविद्यालयाने क्र. वायसीएमके/३/२०२३-२४, दिनांक ०८/०४/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

i) एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणापासून ते शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याची वर्षनिहाय संख्या यादीसह देत आहोत.

ii) संलग्निकरण मान्यता पत्राची सत्यप्रत देत आहोत.

iii) ज्यावेळी पदव्युत्तर विभागास मान्यता मिळाली त्यावेळी M.A. I आणि M.A. II चे वर्ग एकत्रित चालविले जात होते. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून भाग-२ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव नजरचूकीने राहून गेला आहे.

९) तसेच महाविद्यालयाने क्र. वायसीएमके/५२/२०२३-२०२४, दिनांक १९/०६/२०२३ आणि वायसीएमके/ ५४/२०२३-२०२४, दिनांक १९/०६/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

i) त्यावेळी विद्यार्थी संख्या व मान्यता प्राप्त शिक्षकांचा अभाव या दोन्हीही बाबींमुळे एकच वर्ग पर्यायी पध्दतीने चालविला जात असल्याने आमच्याकडून नजरचूकीने द्वितीय वर्षासाठीचा नैसर्गिक विस्ताराबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास देणे राहून गेले.

ii) असे असतानाही आमच्या महाविद्यालयाकडून द्वितीय वर्षासाठीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला व विद्यार्थी पास होवून बाहेर ही पडले.

iii) तद्नंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेश व संख्या अभावी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये सदर पदव्युत्तर विभागातील इंग्रजी विषय बंद करणेबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास सादर केला व त्यानुसार समितीने महाविद्यालयास भेट देवून बंद करण्याची शिफारस ही केली.

iv) पण या प्रक्रियेनंतर विद्यापीठाकडून कोणताही पत्रव्यवहार झाला नाही.

v) दिनांक २३/०३/२०२३ रोजी विद्यापीठ प्रशासनाने एम. ए. (इंग्रजी) विषय बद्दलची माहिती महाविद्यालयाकडून मागविली व तशी माहिती विद्यापीठास सादर केली गेली.

तरी सन २०१५-१६ मध्ये बंदचा प्रस्तावास अनुसरुन समितीने केलेल्या शिफारशीनुसार महाविद्यालयातील एम. ए. (इंग्रजी) विषय बंद झाल्याचे कळवावे व त्यास कोणत्याही प्रकारची दंडात्मक कार्यवाही होवू नये याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा, अशी विनंती केली होती.

१०) सदर पत्रास अनुसरुन प्रस्तुत कार्यालयाच्या दिनांक २६/०५/२०२३ रोजीच्या सादरीकरणावर प्राप्त आदेशानुसार क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२३-२४/५३५३, दिनांक २२/०८/२०२३ नुसार कळविण्यात आले आहे की, आपल्या महाविद्यालयातील एम. ए. (इंग्रजी) भाग १ या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा व भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव विलंबशुल्कासह तात्काळ सादर करावा, जेणेकरुन संलग्निकरणाबाबतची पुढील प्रशासकीय कार्यवाही विहित वेळेत होईल. अन्यथा होणाऱ्या दिरंगाईमुळे भविष्यात काही अडचणी उद्भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, असे कळविण्यात आले होते.

११) तद्नंतर प्रस्तुत कार्यालयाकडून जा. क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/५१७२, दिनांक १९/०७/२०२४ नुसार स्मरणपत्र क्र. १ अन्वये एम. ए. (इंग्रजी) भाग १ याअभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा व

भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव विलंब शुल्कासह तात्काळ सादर करावा, जेणेकरुन संलग्निकरणाबाबतची पुढील प्रशासकीय कार्यवाही विहित वेळेत होईल. अन्यथा होणाऱ्या दिरंगाईमुळे भविष्यात काही अडचणी उद्भवल्यास याची सर्वस्व जबाबदारी आपली राहील, असे अवगत करण्यात आले होते.

१२) उपरोक्त पत्राच्या अनुरोधाने संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचे क्र. वायसीएमके/१७५/ २०२४-२५, दिनांक ०४/०९/२०२४ नुसार महाविद्यालयाने शै. वर्ष २००७-०८ मध्ये नैसर्गिक विस्तार न करता विद्यार्थ्यांस प्रवेश दिला. तत्कालीन प्राचार्य/संस्था यांनी एक वर्षीय एम. ए. हे तत्व समजून तो प्रवेश दिलेला असेल. डॉ. एन. बी. पवार समितीने एम. ए. इंग्रजी बंद चा प्रस्ताव विद्यापीठाने स्वीकारला आहे, असे समजून महाविद्यालयाने त्यावर कार्यवाही केली नाही. तरी महाविद्यालयाने शै. वर्ष २००७-०८ ते शै. वर्ष २०१५-१६ पर्यंतचे संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचा व भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव विलंब शुल्कासह भरण्यास तयार आहोत. तरी शै. वर्ष २००७-०८ ते शै. वर्ष २०१५-१६ चे तात्कालिन नियमाप्रमाणे एकूण शुल्क कळवावे, अशी विनंती केली होती.

१३) त्यानुसार उक्त महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासूनचा प्रस्ताव सध्या देणार असल्याने विद्यापीठ अध्यादेश (Ordinance) क्र. १३० (i) (A) मध्ये " The late fee shall be charged to the application of extension/ continuation and or permanent affiliation received after ३१st August and applications for opening new colleges received after ३०th November, shall be accompanied by, in addition to the fees mentioned above, a late fee of Rs. १,०००/- for each month subsequent to the month of August/November as the case may be including the month in which the application is received." नमूद आहे. याप्रमाणे प्रस्तुत कार्यालयाकडून जा. क्र. पुअहोसोविसो/ संलग्नता/२०२४-२५/८६६६, दिनांक २९/११/२०२४ अन्वये एम. ए. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण आणि भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराकरिता शुल्क, विलंब शुल्क, जीएसटी व फॉर्म शुल्क रु.५,३३,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष तेहत्तीस हजार) फक्त कळविण्यात आले होते.

तद्नंतर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मा. कुलगुरु महोदयांना उद्देशून पत्र क्र. वायसीएमके/३१५/२०२४-२०२५, दिनांक २७/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सन २०१४-१५ साली एम. ए. (इंग्रजी) बंद करण्याविषयी विद्यापीठास प्रस्ताव पाठविला होता. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पर्यंत जे शुल्क होईल ते महाविद्यालय भरण्यास तयार आहे असे महाविद्यालयाने विद्यापीठास दिनांक ०६/१२/२०२४ रोजीच्या पत्रानुसार कळविले होते. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासूनचे शुल्क माफ करण्यासाठी आपल्या स्तरावर कार्यवाही होणेबाबत विनंती केली होती.

त्यानुषंगाने या कार्यासनाच्या दिनांक १०/०२/२०२५ रोजीच्या सादरीकरणावरील प्राप्त आदेशानुसार क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/१६१०, दिनांक २५/०२/२०२५

अन्वये एम. ए. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण आणि भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराकरिता शुल्क, विलंब शुल्क, जीएसटी व फॉर्म शुल्क रु. ५,३७,७२०/- (अक्षरी रुपये पाच लक्ष सदोतीस हजार सातशे वीस) फक्त भरणा करणेबाबत कळविण्यात आले होते.

तद्नंतर संबंधित महाविद्यालयास स्मरणपत्रान्वये अवगत करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद दंडासहितचे शुल्क दिनांक ३० एप्रिल, २०२५ पर्यंतचे काढून स्मरणपत्राचा मसूदा तयार करुन दिनांक ०५/०४/२०२५ रोजीच्या सादरीकरणावर दिनांक १९/०४/२०२५ अन्वये मा. कुलगुरु महोदयांची मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | | शैक्षणिक वर्ष | शुल्क | विलंब शुल्क | एकूण जी.एस.टी. | फॉर्म शुल्क | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | एम. ए. (इंग्रजी) | भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण | २००७ - २००८ पासून | ५,०००/- | २,२४,०००/- | ४१,२२०/- | १,०००/- | २,७१,२२०/- |
| | | भाग २ चा नैसर्गिक विस्तार | २००७ - २००८ पासून | ५,०००/- | २,२४,०००/- | ४१,२२०/- | १,०००/- | २,७१,२२०/- |
| | | | | | | | एकूण रक्कम | ५,४२,४४०/- |

सारांश:

१) शासनाने दिनांक ०३/०६/२००६ रोजीच्या पत्रानुसार एम.ए. भाग १ इंग्रजी या अभ्यासक्रमास मान्यता दिल्याचे निदर्शनास येते.

२) विद्यापीठाच्या दिनांक २७/०६/२००७ रोजीच्या पत्रातील नमूद दिनांक ०५/०६/२००७ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.३३ नुसार संलग्निकरणाच्या संदर्भात नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीने सूचविलेल्या अटींच्या अधीन राहून जून २००६ मध्ये संलग्निकरणाकरिता शैक्षणिक वर्ष २००६-०७ वर्षासाठी प्रथम संलग्निकरणास मान्यता दिल्याचे दिसते.

३) दिनांक २६/०६/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.१२ वर पारीत ठरावानुसार यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर या महाविद्यालयाने सन २००७-०८ ते २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये एम. ए. (इंग्रजी) भाग १ व २ या अभ्यासक्रमाकरिता विद्यापीठाचे संलग्निकरण न घेताच विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने सदरची कार्यवाही २००७-०८ ते २००९-१० या कालावधीतील असल्याने तत्कालीन विद्यापीठ कायद्यातील झालेले बदल हे पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही.

त्यामुळे सदर महाविद्यालयावर विद्यापीठ दंडक O.४४ (iii) नुसार दंडात्मक कारवाई करु नये असे सर्वानुमते ठरले.

तसेच प्रशासकीय स्तरावर इतर बाबी ठरविण्याचे अधिकार व संलग्निकरण देण्याचे ठरले.

४) महाविद्यालयाने एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमाचा भाग १ च्या संलग्निकरणाचे नुतनीकरण व भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव नजरचूकीने विद्यापीठास सादर करणे राहून गेले आहे. असा युक्तीवाद करणे उपलब्ध अभिलेखाशी अनुरुप नाही.

५) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (५) अन्वये नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा वा अतिरिक्त तुकडी यांच्या संलग्निकरणास मंजुरी देण्यात आल्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत प्रवेश देण्यात येणर नाही. ही बाब महाविद्यालयास माहिती असून देखील संलग्निकरण न घेताच महाविद्यालयाने एम. ए. (इंग्रजी) भाग १ व २ या वर्गात विद्यार्थ्यांना परस्पर प्रवेश दिल्याचे अभिलेखावरुन निदर्शनास येते. ही बाब गंभीर आहे.

विद्यापीठ अध्यादेश (Ordinance) क्र.१३० (i) (A) मध्ये "The late fee shall be charged to the application of extension/continuation and or permanent affiliation received after ३१st August and applications for opening new colleges received after ३०th November, shall be accompanied by, in addition to the fees mentioned above, a late fee of Rs. १,०००/- for each month subsequent to the month of August/November as the case may be including the month in which the application is received." नमूद आहे.

तसेच शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम.एम. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता माहे सप्टेंबर २००६ ते एप्रिल २०२५ पर्यंत आणि शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराकरिता माहे सप्टेंबर २००६ ते एप्रिल २०२५ पर्यंत एकूण रु.५,४२,४४०/- (अक्षरी रक्कम रु. पाच लक्ष बेचाळीस हजार चारशे चाळीस) फक्त अध्यादेश (Ordinance) १३० (i) (A) नुसार भरणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक २२/०४/२०२५ रोजी तयार करण्यात आलेल्या सादरीकरणावर प्राप्त आदेशानुसार सदर विषयाचा मसूदा तयार करण्यात आला आहे.

सबब, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम. ए. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण आणि भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावासंदर्भात विद्यापीठाचे अध्यादेश (Ordinance) क्रमांक १३० (i) (A) नुसार एकूण रक्कम रु. ५,४२,४४०/- (अक्षरी रुपये पाच लक्ष बेचाळीस हजार चारशे चाळीस) फक्त विद्यापीठात भरणा करुन घेण्याची बाब विचारार्थ.

ठराव : **यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम. ए. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण आणि भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावासंदर्भात दंडाची रक्कम माफ करावी असे सर्वानुमते ठरले. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून २०१४-१५ पर्यंत प्रति वर्षाप्रमाणे संलग्नता फी आकारण्यात यावी.**

**तसेच येथुन पुढे कोणत्याही प्रकारचा दंड माफ करु नये असे ही सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०३ ] | **मार्च/एप्रिल २०२५ परीक्षेच्या अनुषंगाने संगणक प्रणालीचे व्यवस्थितरित्या हाताळणे/त्याचे व्यवस्थापन करणेकामी (OSM/Non OSM Assessment & Result Processing) संगणक प्रणालीचे ज्ञान असलेल्या प्रा. डॉ. दिपक चंद्रसेन ननवरे यांची विशेष कार्यासन अधिकारी नियुक्त करणेकामी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडील विद्यार्थ्यांच्या निकालाची प्रक्रिया (Process) ही यापूर्वी राज सॉफ्टवेअर, कोअर इन्फोसिस, एम.के.सी.एल., फ्लॅशगेन, वेरीटोस, आय.सी.टी.आर. डी. या विविध संगणकप्रणालीद्वारे करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांच्या निकालाची माहिती (Data) या सर्व संगणक प्रणालीमध्ये होती.<br>विद्यापीठाच्या ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०२४ पासून नव्याने एकात्मिक विद्यापीठ व्यवस्थापन प्रणाली (I.U.M.S.) यांच्यामार्फत नव्याने तयार करण्यात आलेल्या संगणकप्रणालीमध्ये यापूर्वीच्या राज सॉफ्टवेअर, कोअर इन्फोसिस, एम.के.सी.एल., फ्लॅशगेन, वेरीटोस, आय.सी.टी.आर. डी. या सर्व संगणकप्रणालीमध्ये असलेली सर्व माहिती एकत्र करुन निकाल व परीक्षा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे.<br>याबाबत मार्च/एप्रिल २०२५ परीक्षेच्या अनुषंगाने संगणक प्रणालीचे व्यवस्थितरित्या हाताळणे/त्याचे व्यवस्थापन करणेकामी (OSM/Non OSM Assessment & Result Processing) संगणक प्रणालीचे ज्ञान असलेल्या संगणक तज्ञ तथा विशेष कार्यासन अधिकारी नियुक्त करण्याची बाब दि. २२/०४/२०२५ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत विषय क्रमांक १ अन्वये सादर करण्यात आला असता खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.<br>• मार्च/एप्रिल २०२५ या परीक्षेकरीता डिजीटल प्रणालीचा अवलंब करण्यात आला आहे. सदर प्रणाली अंतर्गत OSM Assessment/Non OSM Assessment, निकाल प्रक्रिया इत्यादी कामे सुरळीत करण्याच्या अनुषंगाने प्रा. डॉ. दिपक चंद्रसेन ननवरे, डी. ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर यांची विशेष कार्यासन अधिकारी (OSD) म्हणून मार्च/एप्रिल २०२५ ची निकाल पूर्ण होईपर्यंत दरमहा रु. १५,०००/- इतक्या मानधनावर नियुक्ती करण्याची शिफारस मा. व्यवस्थापन परिषदेस करण्यात येत आहे. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

| | | |
|---|---|---|
| | सबब, मार्च/एप्रिल २०२५ परीक्षेच्या अनुषंगाने संगणक प्रणालीचे व्यवस्थितरित्या हाताळणे/त्याचे व्यवस्थापन करणेकामी (OSM/Non OSM Assessment & Result Processing) संगणक प्रणालीचे ज्ञान असलेल्या प्रा. डॉ. दिपक चंद्रसेन ननवरे यांची विशेष कार्यासन अधिकारी नियुक्त करणेकामी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव : | मार्च/एप्रिल २०२५ परीक्षेच्या अनुषंगाने संगणक प्रणालीचे व्यवस्थितरित्या हाताळणे/त्याचे व्यवस्थापन करणेकामी (OSM/Non OSM Assessment & Result Processing) संगणक प्रणालीचे ज्ञान असलेल्या प्रा. डॉ. दिपक चंद्रसेन ननवरे, डी. ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर यांची व डॉ. इम्रान चंदरकी, एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव यांची विशेष कार्यासन अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच त्यांना विद्यापीठ नियमानुसार दैनिक भत्ता व प्रवास भत्ता अदा करावा असे ही सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळून उर्वरित कार्यभाराच्या अध्यापनाकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ अन्वये कंत्राटी सहायक प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आली होती. दि. २४/०४/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते ठरल्यानुसार परीक्षांच्या कामकाजासाठी सदर कार्यरत कंत्राटी सहायक प्राध्यापकांचा सेवा कालावधी दि. ३१/०५/२०२५ पर्यंत वाढविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्षे २०२४-२५ साठी विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळून, उर्वरित कार्यभाराकरिता विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०३ अन्वये, तसेच विद्यापीठ स्वनिधीतून तात्पुरते कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक भरतीसाठी दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार, एकूण एकशे एकोणीस (११९) शिक्षकांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आली होती.<br>तरी त्याची विहित माहिती पुढीलप्रमाणे आहे. | आस्थापना विभाग (शिक्षक) |

( तक्ता क्र. १ )

| अ.क्र. | शिक्षकाचे नाव | पद | संकुलाचे नाव | रुजू दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | डॉ. प्रक्षाळे विपुल मधुकर | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | पदार्थ विज्ञान संकुल | १२/०८/२०२४ |
| २. | डॉ. गव्हाणे प्रसन्न माधवराव | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | पदार्थ विज्ञान संकुल | १३/०८/२०२४ |
| ३. | श्री. वाघमारे अशरुबा अर्जुन | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | पदार्थ विज्ञान संकुल | १२/०८/२०२४ |
| ४. | डॉ. बांगी उजमा परवीन ख्वाजा हुसेन | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | पदार्थ विज्ञान संकुल | १३/०८/२०२४ |
| ५. | श्री. पाटील आदर्श अनिल | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | पदार्थ विज्ञान संकुल | १६/०८/२०२४ |
| ६. | श्रीमती कोकणे विजयालक्ष्मी कुंडलिक | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ७. | डॉ. पिसाळ परशुराम मारोती | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | १४/०८/२०२४ |
| ८. | डॉ. खोगरे बालाजी त्रिंबक | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ९. | श्रीमती खलिफा अमरिन नईम अहमद | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| १०. | डॉ. (श्रीमती) पिरजादे नरगीसबानो अय्युब | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | १६/०८/२०२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | श्रीमती सांगोलकर राजश्री विकास | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | १६/०८/२०२४ |
| १२. | श्रीमती बनसोडे सविता हरिभाऊ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| १३. | श्रीमती बनसोडे सुलभा गोविंद | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | १४/०८/२०२४ |
| १४. | श्री. पेंडपाले हरिश संजय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | ०२/०९/२०२४ |
| १५. | श्रीमती. गवळी मृणमयी महादेव | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | ०२/०९/२०२४ |
| १६. | श्री. चौगुले सिध्दाराम नागनाथ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | ०२/०९/२०२४ |
| १७. | डॉ. येडगे अनिल सिध्देश्वर | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| १८. | श्रीमती सावंत रोहिणी मगन | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | १४/०८/२०२४ |
| १९. | श्री. उन्हाळे प्रशांत लक्ष्मण | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| २०. | श्रीमती नष्टे स्नेहल संतोष | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| २१. | श्रीमती पांढरे अश्विनी रामचंद्र | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १४/०८/२०२४ |
| २२. | डॉ. (श्रीमती) हजारे ज्ञानेश्वरी बाळकृष्ण | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| २३. | डॉ. भोसले वर्षा हैभाती | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | २४/०९/२०२४ |
| २४. | डॉ. काळे संतोष पोपट | कंत्राटी सहायक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| २५. | डॉ. शिंदे सचिन पांडुरंग | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| २६. | श्री. तांबोळी तारीक लतिफ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| २७. | डॉ. (श्रीमती) कांबळे तेजस्विनी रंगनाथ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| २८. | डॉ. भासके अंबादास लक्ष्मण | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| २९. | श्री. मंडलिक ऋषिकेश बाळासाहेब | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १२/०८/२०२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | डॉ. जक्कन मधुकर दिगंबर | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| ३१. | श्री. एडके विठ्ठल बिरु | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १२/०८/२०२४ |
| ३२. | डॉ. (श्रीमती) गाजरे-पाटील सुनिता दत्तात्रय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| ३३. | श्री. शिंगे हर्षल शशिकांत | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| ३४. | श्री. शेख हाजिमलंग अकबर | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| ३५. | श्री. खडखडे विष्णु कृष्णा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| ३६. | श्री. भोसले राम गणपतराव | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १३/०८/२०२४ |
| ३७. | श्री. राठोड सागर गोपाल | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १६/०८/२०२४ |
| ३८. | डॉ. भंडारे श्रीनिवास सायण्णा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | १४/०८/२०२४ |
| ३९. | श्री. म्हमाणे राजेंद्रा बाळासाहेब | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | ०२/०९/२०२४ |
| ४०. | डॉ. श्रीमती घोलप विद्या दत्तात्रय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४१. | श्रीमती खडलोया खुशी लक्ष्मीकांत | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४२. | श्रीमती गते निकीता रणजीत | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४३. | श्रीमती कोळी विशाल अप्पाराव | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४४. | श्रीमती वलेकर अंजली दशरथ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४५. | श्रीमती जगले महिमा हेबल | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४६. | श्रीमती चौडयाल मनिषा प्रविण | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४७. | श्रीमती हारके सुप्रिया सिध्दप्पा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ४८. | श्रीमती जावळे -पाटील प्रतिक्षा नंदकुमार | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४९. | श्रीमती चौगुले अश्विनी तुकाराम | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ५०. | श्रीमती शिंदे प्राजक्ता संजय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ५१. | श्री. खमितकर निखील संजय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ५२. | श्रीमती डॉ. सावंत वनिता जगन्नाथ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | १३/०८/२०२४ |
| ५३. | श्रीमती जगदाळे मुग्धा महेश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | १४/०८/२०२४ |
| ५४. | श्रीमती घंटे सौजन्या मनोज | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | १९/०८/२०२४ |
| ५५. | श्रीमती होनमाने वनिता विजय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | १६/०८/२०२४ |
| ५६. | डॉ. (श्रीमती) दातार रश्मी सचिन | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन (एम.बी.ए.) | १३/०८/२०२४ |
| ५७. | डॉ. सय्यद इम्तियाज मासुमअली | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन (एम.बी.ए.) | १३/०८/२०२४ |
| ५८. | डॉ. (श्रीमती) मुंडेवाडीकर जयश्री | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन (एम.बी.ए.) | १३/०८/२०२४ |
| ५९. | श्री. नादरगी विघ्नेश घनशाम | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन (एम.बी.ए.) | १३/०८/२०२४ |
| ६०. | श्रीमती काळे विद्या दगडू | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ६१. | डॉ. (श्रीमती) लेंडवे विद्या सदाशिव | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ६२. | श्रीमती देवळे श्रृती दत्तात्रय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ६३. | डॉ. चेंडके अमोगसिध्द शिवाजी | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | २१/१०/२०२४ |
| ६४. | श्रीमती डॉ. पाटील तानाबाई सुभाष | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १४/०८/२०२४ |
| ६५. | डॉ. संकपाळ गणेश तुकाराम | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ६६. | डॉ. (श्रीमती) बागवान सुमय्या न. अ. | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६७. | श्रीमती पठाण आयेशा ए. अझीझ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ६८. | डॉ. तडवळ शिवानंद विठ्ठल | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ६९. | डॉ. (श्रीमती) एलगंडी गौरम्मा रेवणप्पा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ७०. | डॉ. कांबळे उत्तम हरिबा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १६/०८/२०२४ |
| ७१. | श्री. झुंबारे विजयकुमार बुधप्पा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ७२. | श्रीमती शाह श्रेया श्रेणीक | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ७३. | श्रीमती शाह दिपा सतिश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ७४. | श्रीमती बोल्ली ममता लक्ष्मीनारायण | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | १३/०८/२०२४ |
| ७५. | श्रीमती पठाण मुंझरीन मलिक | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | ०२/०९/२०२४ |
| ७६. | श्रीमती तांबोळी तसलीम युसुफ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | ०२/०९/२०२४ |
| ७७. | श्रीमती भांजे मिनल विनायक | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | १३/०८/२०२४ |
| ७८. | श्री. गुंड मारुती सुखदेव | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | १३/०८/२०२४ |
| ७९. | श्रीमती नरळे अश्विनी महादेव | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | १३/०८/२०२४ |
| ८०. | श्री. तेलंगे चंद्रशेखर रविंद्र | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | १४/०८/२०२४ |
| ८१. | श्री. सोमवंशी विशाल शिवाजी | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | १६/०८/२०२४ |
| ८२. | श्री. देशमुख अमोल अंबादास | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | १३/०८/२०२४ |
| ८३. | श्रीमती गावडे श्वेता सदानंद | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | १३/०८/२०२४ |
| ८४. | श्री. टाकळीकर धनंजय विजय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | १३/०८/२०२४ |
| ८५. | श्री. बिराजदार संगमेश्वर गणेश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | १३/०८/२०२४ |
| ८६. | श्रीमती दहिवळ शिवानी गणेश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | १६/०८/२०२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८७. | श्रीमती अक्कलकोटे राजश्री सतिश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | जैवशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ८८. | डॉ. (श्रीमती) शिवशरण रोहिणी रविंद्र | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | जैवशास्त्र संकुल | १६/०८/२०२४ |
| ८९. | डॉ. अय्यर प्रिया विजयकुमार | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | जैवशास्त्र संकुल | १३/०८/२०२४ |
| ९०. | श्रीमती दिवटे श्वेता राजकुमारु | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | जैवशास्त्र संकुल | १५/१०/२०२४ |
| ९१. | श्रीमती अवताडे तृप्ती रमेश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | आरोग्य विज्ञान संकुल | १३/०८/२०२४ |
| ९२. | श्रीमती मस्के शालिनी निशिकांत | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | आरोग्य विज्ञान संकुल | ०२/०९/२०२४ |

वरीलप्रमाणे नियुक्त ब्याण्णव (९२) शिक्षकांव्यतिरिक्त खालील सत्तावीस (२७) शिक्षकांमधील काही शिक्षक त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव रुजू होऊ शकले नाहीत. तर काही शिक्षकांनी त्यांच्या कामकाजाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी राजीनामा दिलेला आहे व दोन (०२) शिक्षकांचे दु:खद निधन झाले आहे. त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

**(तक्ता क्र.२)**

| अ.क्र. | कंत्राटी शिक्षकाचे नांव | पद | संकुलाचे नाव | रुजू दिनांक | राजीनामा व इतर कारणामुळे पद रिक्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्रीमती मलशेटे शिवकन्या जानकीराम | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | पदार्थ विज्ञान संकुल | रुजू झाले नाहीत | |
| २. | श्री. पवार स्वप्निल नेहरु | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | पदार्थविज्ञान संकुल | दि. ०२/०९/२०२४ | राजीनामा दि. ३०/११/२०२४ |
| ३. | डॉ. मळेगावकर ज्योतिराम नागनाथ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | दि.१४/०८/२०२४ | राजीनामा दि.०५/०२/२०२५ |
| ४. | डॉ. हुबळीकर महेश गोरखनाथ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र संकुल | रुजू झाले नाहीत | |
| ५. | डॉ. गावडे नाना लिंगप्पा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | | | |
| ६. | श्री. मुपडे महेश राजेंद्र | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भूशास्त्र संकुल | रुजू झाले नाहीत | |
| ७. | डॉ. सिरसट संदीप किसन | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | | | |
| ८. | डॉ. गोडबोले महेंद्र तुकाराम | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | डॉ. पवार रुपेश अजिनाथ | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | दि. १३/०८/२०२४ | राजीनामा दि. ३१/०८/२०२४ |
| १०. | डॉ. भोसले भास्कर प्रभाकर | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | दि. १७/०८/२०२४ | राजीनामा दि. २०/०९/२०२४ |
| ११. | श्री. भोपळे ओंकार आनंद | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | सामाजिकशास्त्रे संकुल | रुजू झाले नाहीत | |
| १२. | श्रीमती चिप्पा प्रियांका आनंद | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | आकस्मिक निधन दि. ३१/१०/२०२४ | |
| १३. | डॉ. घोलप दत्तात्रय पंडित | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | दि. १४/०८/२०२४ | राजीनामा दि. २३/०९/२०२४ |
| १४. | श्री. रुगे कमलाकर शिवलिंगप्पा | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | दि. १३/०८/२०२४ | राजीनामा न देता सोडून गेले. |
| १५. | डॉ. शर्मा विजय जगदीश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | रुजू झाले नाहीत | |
| १६. | श्री. बरबडे ओमप्रकाश अशोक | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | भाषा व वाङ्मय संकुल | आकस्मिक निधन दि. ३१/१२/२०२४ | |
| १७. | श्रीमती पाटील प्रिया हनामंत | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | दि. १३/०८/२०२४ | राजीनामा दि. १८/०१/२०२५ |
| १८. | श्री. जगताप गणेश भारत | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | रुजू झाले नाहीत | |
| १९. | श्रीमती शेंडगे सुप्रिया सुनिल | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | रुजू झाले नाहीत | |
| २०. | श्रीमती सुरवसे प्रियंका रमेश | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | तंत्रज्ञान संकुल | दि. १७/०८/२०२४ | राजीनामा दि. २०/०८/२०२४ |
| २१. | श्री गुप्ता प्रिन्स अजय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | दि. १६/०८/२०२४ | राजीनामा दि. १९/१०/२०२४ |
| २२. | श्री माळवदे कृष्णात राजेंद्र | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | ललितकला व कला संकुल | रुजू झाले नाहीत | |
| २३. | श्रीमती मुडगी रुपाली मल्लीकार्जुन | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | जैवविज्ञान संकुल | दि. १६/०८/२०२४ | राजीनामा दि. ३१/१०/२०२४ |
| २४. | श्रीमती काझी झुवेरियॉ मरयम तौफिक | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | जैवविज्ञान संकुल | रुजू झाले नाहीत | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५. | श्री रार्चला विरेंद्र विलास | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | जैवविज्ञान संकुल | रुजू झाले नाहीत |
| २६. | श्रीमती नवले वैष्णवी धनजंय | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | आरोग्य विज्ञान संकुल | रुजू झाले नाहीत |
| २७. | श्री गवळी अभिषेक चंद्रकांत | कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक | आरोग्य विज्ञान संकुल | रुजू झाले नाहीत |

संलग्नता विभाग, शैक्षणिक, संशोधन आणि विकास या विभागाचे शैक्षणिक वर्षे २०२४-२५ साठीचे सत्र आरंभ व सत्र समाप्ती संदर्भातील परिपत्रक क्र. पुअहोसोविसो /संलग्नता/परिपत्रक/२०२४/३२९९, दि. २९ एप्रिल २०२४ व तक्ता क्र. १ मधील संबंधित ब्याण्णव (९२) शिक्षकांच्या नियुक्ती आदेशात नमूद केल्याप्रमाणे त्यांचा सेवेचा कालावधी M.B.A. च्या अध्यापकांचा कालावधी वगळून दि. ३०/०४/२०२५ रोजी पूर्ण होत असल्याने त्यांना सेवामुक्त करावे लागणार आहे.

तथापि दि. २४/०४/२०२५ रोजी मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली, मा. प्र-कुलगुरु महोदय, मा. कुलसचिव महोदय यांच्या उपस्थितीत विद्यापीठ परिसर शैक्षणिक संकुलांचे मा. संचालकांची बैठक दि. २४/०४/२०२५ रोजी विद्यापीठ कार्यालयात संपन्न झाली. पुढील महिन्यात परीक्षांचा कालावधी असल्याने कंत्राटी सहायक प्राध्यापकांचा सेवा कालावधी १ महिन्याकरिता म्हणजेच दि. ३१/०५/२०२५ पर्यंत वाढविण्याचे सदर बैठकीमध्ये सर्वानुमते ठरले आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळून उर्वरित कार्यभाराच्या अध्यापनाकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ अन्वये कंत्राटी सहायक प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आली होती. दि. २४/०४/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते ठरल्यानुसार परीक्षांच्या कामकाजासाठी सदर कार्यरत कंत्राटी सहायक प्राध्यापकांचा सेवा कालावधी दि. ३१/०५/२०२५ पर्यंत वाढविण्याची बाब सादर.

**ठराव :** **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळून उर्वरित कार्यभाराच्या अध्यापनाकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ अन्वये नियुक्त केलेल्या कंत्राटी सहायक प्राध्यापकांचा सेवा कालावधी दि. ३१/०५/२०२५ पर्यंत वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५ (१) ] | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल, यांचे कॅस अंतर्गत A.L. १२ to A. L. १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समिती करिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार विद्या परिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीन पेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ शैक्षणिक संकुलात नियमित पदावर कार्यरत डॉ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to Academic Level १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक) पदोन्नतीकरिता शासननिर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील नुसार गठीत करावयाच्या निवड समिती मधील क्र. v तरतूदी नुसार ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले तीन पेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांची निवड करावयाची तरतूद विषद केली आहे.<br>त्यानुसार डॉ. ज्योती धर्मेंद्र माशाळे यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीची पुढील प्रक्रिया पार पाडण्यासाठी Mathematics या विषयासाठी विद्यापीठाबाहेरील विषय तज्ज्ञांची आवश्यकता असल्याने प्रस्तुत विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता यांचेकडून संबंधित विषयातील विषय तज्ज्ञांची यादी मागविण्यात आली असून, त्यांनी आठ विषयतज्ज्ञांची यादी दिलेली आहे.<br>त्यानुषंगाने सदर विषयतज्ज्ञांच्या यादीमधील सहा विषय तज्ज्ञांची नावे दि. २८/०४/२०२५ रोजीच्या मा. विद्यापरिषदेच्या बैठकीत अधोरेखित करुन मा. विद्यापरिषदेने सर्वानुमते शिफारस केली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल, यांचे कॅस अंतर्गत A.L. १२ to A. L. १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समिती करिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार विद्या परिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित | आस्थापना विभाग (शिक्षक) |

| | | |
|---|---|---|
| | नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीन पेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | |
| ठराव : | प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. ज्योती धर्मेंद्र माशाळे, सहायक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल, यांचे कॅस अंतर्गत A.L. १२ to A. L. १३A पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार विद्या परिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीन पेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांचे खालीलप्रमाणे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.<br>१. डॉ. डी. डी. पवार,<br>प्राध्यापक,<br>मॅथेमॅटीकल सायन्सेस संकूल,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,<br>नांदेड.<br>२. प्रा. शहाजी पवार,<br>प्राध्यापक,<br>कवयित्री बहिणीबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,<br>जळगाव.<br>३. प्रा. डॉ. विनायक जोशी,<br>प्राध्यापक,<br>गणित विभागप्रमुख,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.<br>तसेच उक्त तज्ज्ञ व्यक्तीने असमर्थता दर्शविल्यास नवीन नामनिर्देशाचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५(२) ] | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल, यांचे कॅस अंतर्गत A.L. १४ to A. L. १५ पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समिती करिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार विद्या परिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीन पेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ शैक्षणिक संकुलात नियमित पदावर कार्यरत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत Academic Level १४ to Academic Level १५ (प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक) पदोन्नतीकरिता शासननिर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील नुसार गठीत करावयाच्या निवड समिती मधील क्र. v तरतूदी नुसार ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले तीन पेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांची निवड करावयाची तरतूद विषद केली आहे.<br>त्यानुसार डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीची पुढील प्रक्रिया पार पाडण्यासाठी Physics या विषयासाठी विद्यापीठाबाहेरील विषय तज्ज्ञांची आवश्यकता असल्याने प्रस्तुत विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता यांचेकडून संबंधित विषयातील विषय तज्ज्ञांची यादी मागविण्यात आली असून, त्यांनी सहा विषयतज्ज्ञांची यादी दिलेली आहे.<br>त्यानुषंगाने सदर विषय तज्ज्ञांच्या यादीमधील सहा विषय तज्ज्ञांची नावे दि. २८/०४/२०२५ रोजीच्या मा. विद्यापरिषदेच्या बैठकीत अधोरेखित करुन मा. विद्यापरिषदेने सर्वानुमते शिफारस केली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल, यांचे कॅस अंतर्गत A.L. १४ to A. L. १५ पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समिती करिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार विद्या परिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीन पेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग (शिक्षक) |
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, प्राध्यापक, भौतिकशास्त्र संकुल, यांचे कॅस अंतर्गत A.L. १४ to A. L. १५ पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समिती करिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ मधील तरतूदीनुसार विद्या परिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीन पेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांचे खालीलप्रमाणे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**<br>**१. प्रा. डॉ. के. वाय. राजापुरे,**<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.<br>**२. प्रा.डॉ. एम. बी. शिरसाट,**<br>प्राध्यापक, डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.<br>**३. प्रा. डॉ. बी. एम. बांबोले,**<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई.<br>**तसेच उक्त तज्ज्ञ व्यक्तीने असमर्थता दर्शविल्यास नवीन नामनिर्देशाचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५(३)] | संगणकशास्त्र संकुलात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून B.Sc. (E.C.S.) हा अभ्यासक्रम सुरु करणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ. | संगणकशास्त्र संकुल |
| ठराव : | संगणकशास्त्र संकुलात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून B.Sc. (E.C.S.) हा अभ्यासक्रम सुरु करणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५(४)] | भूशास्त्र संकुलात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून B.Sc. Geoinformatics हा अभ्यासक्रम सुरु करणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ. | भूशास्त्र संकुल |
| ठराव : | भूशास्त्र संकुलात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून B.Sc. Geoinformatics हा अभ्यासक्रम सुरु करणेबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

29/04/2025
सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

29/4/25
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद